Peer Reviewed Referred and
UGC Listed Journal
(Journal No. 40776)

ISSN 2277 - 5730

AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY
QUARTERLY RESEARCH JOURNAL

# AJANTA

Volume-VII, Issue-II
April - June - 2018
Part - I

IMPACT FACTOR / INDEXING
2017 - 5.2
www.sjifactor.com



Ajanta Prakashan

VOLUME - VII, ISSUE - II - APRIL - JUNE - 2018
AJANTA - ISSN 2277 - 5730 -IMPACT FACTOR -5.2 (www.sjifactor.com)

# २. महाराष्ट्रातील विकासात शेती क्षेत्राचे योगदान व शेतीचे बदलते स्वरूप

**डॉ. बी. आर.गायकवाड**
सहयोगी प्राध्यापक व अर्थशास्त्र विभाग प्रमुख, अंकुशराव टोपे महाविद्यालय, जालना.
**डॉ. हिंगे म्हातारबा गोविंद**
सहा. प्राध्यापक, जे.ई.एस.महाविद्यालय, जालना.

**प्रस्तावना:**

जगातील बहुतांश देशाच्या विकासाचा मुलभूत आधार शेती असून शेतीचा विकासझाला की, उद्योग व सेवा क्षेत्राचा विकास होतो.अर्थातच देशाच्या सर्वांगीण विकासाचा पाया शेती क्षेत्र हाच असल्याचे आपणास दिसून येते.''जगातील दोन तृतीयांश लोकसंख्येपेक्षा जास्त लोकांचा शेती हाच प्रमुख व्यवसाय आहे.''कोणत्याही देशाच्या अर्थव्यवस्थेत कृषी क्षेत्राला अनन्यसाधारण महत्त्व असते.'विल्सन, बार्कर, बारसोडी या तज्ज्ञांच्या मते, ''शेती हे अर्थव्यवस्थेतील मुलभूत क्षेत्र होय. कारण जागतिक लोकसंख्येचा विचार करता अद्यापही जगातील बहुसंख्य लोक आपल्या उपजीविकेसाठी शेतीवर अवलंबून आहेत. मानवाची अन्नाची प्राथमिक गरज हेच क्षेत्र पूर्ण करते आणि अनेक उद्योगांना कच्चा माल पुरविण्याचे कामही शेतीतूनच होते.तसेच शेतमालाच्या निर्यातीवर अनेक अर्थव्यवस्था अवलंबून असतात.त्यामुळे शेती हाच खरा मुलभूत व्यवसाय आहे.''म्हणूनच अनेक अर्थव्यवस्था ह्या शेती क्षेत्रावर अधिक प्रमाणात अवलंबून असल्याच्या दिसून येतात.

थोडक्यात शेती व्यवसायाची जगातील अर्थव्यवस्थेत महत्त्वाची भूमिका असून दीर्घकाळाचा विचार करता आर्थिक विकास, सातत्य व अखंडता प्राप्तीच्या दृष्टीने शेती व्यवसायास उल्लेखनीय स्थान आहे.अर्थव्यवस्थेच्या रचनात्मक व गुणात्मक विकासात कृषी क्षेत्र महत्त्वपूर्ण भूमिका पार पाडताना दिसून येते.

भारतासारख्या कृषीप्रधान व विकसनशील देशात शेतीला अनन्यसाधारण महत्त्व आहे.''भारत हा शेतीप्रधान देश असून भारतात शेती व्यवसायाला अर्थव्यवस्थेचा कणा मानले जाते.भारतीय अर्थव्यवस्थेची प्रगती ही शेती क्षेत्राच्या विकासावरच अवलंबून आहे.प्राचीन काळापासून भारतीय लोकांचा शेती हा प्रमुख व्यवसाय आहे.''भारतीय अर्थव्यवस्थेचे एक प्रमुख वैशिष्ट्य म्हणजे कृषी क्षेत्रावर उपजीविकेसाठी अवलंबून असणाऱ्या लोकांचे प्रमाण जास्त आणि म्हणून येथे प्राथमिक वस्तुंचे उत्पादन केले जाते.''आजही एकूण लोकसंख्येच्या अर्ध्यापेक्षा जास्त लोकसंख्या कृषी क्षेत्रावर अवलंबून आहे.

**उद्दिष्ट्ये**

१) महाराष्ट्राच्या कृषी अर्थरचनेचा अभ्यास करणे.

२) महाराष्ट्रातील शेतीचे बदलते स्वरूप अभ्यासणे.

| | | |
|---|---|---|
| ६ | २०१०-११ | १२.९ |
| ७ | २०११-१२ | १२.९ |
| ८ | २०१२-१३ | ११.४ |
| ९ | २०१३-१४ | ११.८ |
| १० | २०१४-१५ | १०.४+ |

स्त्रोत : www.mahades.maharashtra.gov.in

वरील तक्ता मधील आकडेवारीवरुन लक्षात येते की, सन.१९६०-६१ या वर्षी स्थूल राज्य उत्पादनात शेतीचा वाटा ३१.४ टक्के इतका होता, तर २०१३-१४ या वर्षात ११.८ टक्के इतका होता. १९६०-६१ ते २०१३-१४ या कालावधीत स्थूल राज्य उत्पनातील शेती क्षेत्राचा वाटा कमी झालेला दिसून येतो.सुरुवातीला एकूण उत्पन्नात शेतीपासून मिळणाऱ्या उत्पन्नाचा वाटा अधिक होता.परंतु अलिकडील काळात त्यात घट झालेली दिसून येते.म्हणजेच राज्यात उद्योग व सेवा क्षेत्राच्या तुलनेत शेती क्षेत्राचा विकास कमी दराने झाल्याचे आढळते.असे असले तरीही शेती क्षेत्राचे महत्त्व अजूनही कमी झालेले नाही.

**रोजगारातील वाटा :**

महाराष्ट्राच्या अर्थव्यवस्थेत रोजगार प्राप्तीसाठी अधिक लोकसंख्या ही शेती क्षेत्रावर अवलंबून आहे.त्याचप्रमाणे त्यांच्या उपजिविकेचे साधन शेती व्यवसाय हाच असल्याचे दिसून येते.“महाराष्ट्रातील बहुतांश लोकांना आपल्या उपजीविकेसाठी शेतीवर अवलंबून रहावे लागते.ग्रामीण जनतेच्या दृष्टीने शेती हेच उपजीविकेचे साधन आहे.”म्हणून राज्याच्या अर्थव्यवस्थेत शेतीचे स्थान महत्त्वाचे आहे.“आजही रोजगाराच्या दृष्टीने सर्वात जास्त लोकसंख्या शेतीमध्ये कार्यरत आहे.रोजगारासाठी आजही जवळपास ५८ टक्के लोक कृषी क्षेत्रावर अवलंबून असलेले दिसतात.”तसेच “महाराष्ट्राच्या ग्रामीण भागातील लोकसंख्येपैकी एकूण लोकसंख्येच्या जवळपास ६० टक्के लोक शेतीवर अवलंबून आहेत.यात शेतमालक व शेतमजूर इत्यादी लोकांचा समावेश होतो.भविष्यकाळात आर्थिक विकासाची गती वाढून शेतीवर अवलंबून असणाऱ्यांची संख्या कमी होईल, परंतु महाराष्ट्र राज्याचा आर्थिक विकास शेतीच्या विकासावरच अवलंबून असल्यामुळे शेतीला अत्यंत महत्त्व आहे.”थोडक्यात शेती क्षेत्र रोजगार व उपजीविकेचे प्रमुख साधन असल्याने आणि लोकसंख्या अधिक प्रमाणात कृषी क्षेत्रावर अवलंबून असल्यामुळे शेती क्षेत्राला अनन्यसाधारण असे महत्त्व असल्याचे दिसून येते.

**राज्यातील अन्नधान्य उत्पादन :**

राज्यातील वाढत्या लोकसंख्येचे पोषण करण्यासाठी अन्नधान्य पुरविण्याची जबाबदारी शेती क्षेत्रालाच पार पाडावी लागते.अन्नधान्याचे उत्पादन हे हरित क्रांती नंतरच्या काळात वेगाने वाढले.त्यामुळे वाढत्या लोकसंख्येला अन्नधान्य पुरविण्याकरिता शेती फार उपयुक्त ठरली आहे.लोकसंख्या वाढीचा वेग असाच कायम राहिला तर भविष्यात शेतीची उत्पादकता

**महाराष्ट्रातील शेतीचे बदलते स्वरूप :**

शेती हा मानवाचा सर्वात प्राचीन व्यवसायांपैकी एक महत्त्वाचा व्यवसाय आहे. "कृष म्हणजे नांगरणे या शब्दापासून कृषी हा शब्द बनला आहे. जमीन नांगरुन तिच्यात बी-पेरणे आणि पेरलेल्या बियांची व त्यांच्या रोपांची काळजी वाहून त्यांच्यापासून धान्य मिळविणे म्हणजे शेती किंवा कृषी होय." "प्राचीन काळापासून मानव शेती करीत आला आहे.प्रथम अगदी तुटपुंज्या साधनांचा उपयोग करुन मानवाने निसर्गदत्त वनस्पतींचा योग्य फायदा घेऊन शेतीचा पाया घातला.साध्या नांगरापासून ते थेट ट्रॅक्टर पर्यंतच्या अद्ययावत यंत्राचा शेतीसाठी मानव उपयोग करीत आला आहे." मानव जेव्हापासून एका ठिकाणी स्थायिक झाला तेव्हापासून शेतीला स्थिरता प्राप्त झाली.वाढती लोकसंख्या आणि वाढत्या अन्नधान्यांच्या पुरवठ्यासाठी शेतीमध्ये विविध प्रयोग करून जास्तीचे उत्पादन घेण्याचा प्रयत्न करू लागला.जस जशी विज्ञानाने प्रगती केली त्या प्रमाणात शेतीच्या साधनात बदल होत गेला आणि त्यामुळे उत्पादनात देखील बदल घडून आला.तसेच शेतीच्या नवीन साधनांचा वापर करण्यास सुरूवात झालेली दिसून येते.

शेतीमध्ये वापरले जाणारे तंत्रज्ञान जेवढे अद्ययावत असेल, नवीन असेल तेवढे उत्पादन अधिक होईल. परंतु राज्याच्या शेतीचा आकार अनार्थिक असल्याने नवीन तंत्रज्ञान वापरण्यावर मर्यादा पडतात.हरित क्रांतीच्या संदर्भात कॅरोल स्ट्रीटरने ज्याचे वर्णन "one of the most amazing Agricultural Stories of all time" असे केले.ती हरित क्रांती म्हणजे शेतीच्या विकासासाठी लागू केलेले नवीन तंत्रज्ञान होय." नवीन तंत्रज्ञानाचा शेतीमधील प्रयोग उत्पादन वाढविण्यासाठी उपयुक्त ठरताना दिसतो. "कृषी उत्पादनाच्या तंत्रामध्ये अमुलाग्र स्वरुपाचा बदल होऊन अन्नधान्याच्या उत्पादनात मोठ्या प्रमाणात वाढ होणे म्हणजे हरित क्रांती होय." कृषी उत्पादनाच्या तंत्रामध्ये बदल व कृषी उत्पादनात वाढ होणे म्हणजेच हरित क्रांती असे म्हटले जाते.

महाराष्ट्रातील शेती निसर्गावर आधारित असल्याने सिंचनाच्या आधुनिक पद्धतीचा आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करणे कृषी क्षेत्रात महत्त्वाचे ठरताना दिसून येते.१९६५-६६ या दशकात भारतात कृषी क्षेत्रात हरित क्रांतीमुळे नवचैतन्याचे वारे वाहू लागले.महाराष्ट्राच्या शेती उत्पादनात वाढ घडवून आणण्यासाठी व वाढत्या लोकसंख्येच्या अन्नधान्याच्या गरजा पूर्ण करण्याकरिता शेतीत नवीन तंत्रज्ञानाचा स्वीकार करणे अपरिहार्य बाब होती. शेती कसण्याच्या आधुनिक व नव्या तंत्रज्ञानाची मिळत्या-जुळत्या नसणाऱ्या जुन्या शेती उत्पादन पद्धतीचा त्याग करणे आणि त्याऐवजी नव्या व आधुनिक पद्धतीचा व तंत्रज्ञानाचा स्वीकार करणे. त्यामार्फत शेती उत्पादनात वाढ घडवून आणणे म्हणजे हरित क्रांती होय. "शेती क्षेत्रात परंपरागत तंत्राऐवजी सुधारित तंत्रांचा स्वीकार केल्यामुळे कृषी उत्पादनात मोठ्या प्रमाणात वाढ झाली. आधुनिक तंत्रज्ञानामध्ये रासायनिक खते, अधिक उत्पादन देणाऱ्या पिकांच्या जाती, किटकनाशके, जलसिंचन सुविधा इत्यादी घटकांचा समावेश होतो. या विविध घटकांचा एकत्रित परिणाम म्हणजे कृषी उत्पादनात वेगाने वाढ होते."

हरित क्रांती नंतरच्या काळात निश्चितच महाराष्ट्र राज्याची अर्थव्यवस्था सुधारली आहे.राज्यातील शेती केवळ उपजीविकेचे साधन असलेल्या शेती क्षेत्रास अलिकडील काळांत व्यापारी दृष्टीकोन प्राप्त होताना दिसून येतो.महाराष्ट्रात शेतीचे व्यापारीकरण होत आहे.यात संशय नाही.बाजार रचनेतील व मागणीतील बदलांमुळे व्यापारीकरण होताना दिसून येते.

थोडक्यात महाराष्ट्रामध्ये आर्थिक संपन्नता आणावयाची असेल तर शेती क्षेत्राचा विकास घडवून आणणे महत्त्वाचे आहे.अलिकडील काळात नवीन सिंचनक्षमता व तंत्रज्ञानाचा वापर शेती क्षेत्रात करण्यात येऊ लागल्याने शेती उत्पादनात वाढ व शेतीचा विकास होण्यास मदत झालेली दिसून येते.

**संदर्भ :**

१. डॉ. विजय कविमंडन - कृषी अर्थशास्त्र, श्री मंगेश प्रकाशन, नागपूर.
२. र.ग. पैठणकर - भारतीय अर्थव्यवस्थेची रचना, कुलसचिव व मुक्त विद्या केंद्र, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे.
३. दत्ताजीराव को. साळुंखे आणि जगन्नाथराव रा. पवार- महाराष्ट्राची कृषी अर्थव्यवस्था, कॉन्टिनेन्टलप्रकाशन, पुणे.
४. डॉ. वसुधा पुरोहित-खांदेवाले, भारतीय अर्थव्यवस्था, विद्या बुक्स पब्लिशर्स, औरंगाबाद.
५. डॉ. विश्वास कदम आणि डॉ. गणेश गावंडे - कैलाश पब्लिकेशन्स, औरंगाबाद, गौरव दत्त आणि अश्विनी महाजन दत्त एवं सुंदरम भारतीय अर्थव्यवस्था,एस.चन्द एण्ड कम्पनी प्रा.लि. रामनगर, दिल्ली, (तिरपन्नवे संस्करण २०१४)
६. प्रा. दत्ताजीराव को. साळुंखे, आणि प्रा. जगन्नथराव रा. पवार - महाराष्ट्राची कृषी अर्थव्यवस्था, कॉन्टिनेन्टलप्रकाशन, पुणे.
७. डॉ. बी. डी. इंगळे - महाराष्ट्राची अर्थव्यवस्था, अरुणा प्रकाशन, लातूर.
८. डॉ. माधवराव बिराजदार - महाराष्ट्राची अर्थव्यवस्था, विद्या बुकपब्लिशर्स,औरंगाबाद,महाराष्ट्राची अर्थव्यवस्था, अरुणा प्रकाशन.
९. प्रा. सौ. राजेश्री अप्पाराव जाधव (जगताप)लातूर.
१०. प्रा. रा. ना. भालेराव,प्रा. भा. पा. निकम आणि प्रा. अ. दि. खाचणे - महाराष्ट्राची अर्थव्यवस्था, विद्या बुक्सपब्लिशर्स, औरंगाबाद.
११. डॉ. वसूधा पुरोहित-खांदेवाले - भारतीय अर्थव्यवस्था, विद्या बुक्स पब्लिशर्स, औरंगाबाद.
१२. अर्थ व सांख्यिकी संचलनालय - 'महाराष्ट्राची आर्थिक पाहणी' २०१४-१५, नियोजन विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई.